# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.11.2025** **वार- रविवार**

---

**पुस्तकमहोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सव, सायकल स्पर्धा असे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने होत राहण्याची गरज आहे. त्यातूनच पुण्याचे पर्यटन, संस्कृतीला चालना मिळण्यास मदत होईल, असं मत उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलं आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सव यंदा १३ ते २१ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत काल वासापूजन करून महोत्सवाच्या मांडव उभारणीची सुरुवात करण्यात आली. महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे म्हणाले, 'पुणे पुस्तक महोत्सव हा पुणेकरांचा उत्सव झाला आहे. महोत्सवातील दालने आठशे पर्यंत पोहोचली असून भारतातील सर्वांत मोठ्या महोत्सवांत पुणे पुस्तक महोत्सव दुसऱ्या स्थानी आहे. 'शांतता पुणेकर वाचत आहेत, हा उपक्रम यंदा ९ डिसेंबरला होणार आहे. या कार्यक्रमाचा विश्वविक्रम नोंदवण्याचा प्रयत्न आहे."

**नवलेपुलप्राथमिकअहवाल**

पुण्यातील नवले पूलाजवळ 13 नोव्हेंबरला झालेल्या अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यात आला असून पुणे प्रादेशिक परिवहनच्या प्राथमिक तपासणीनुसर कंटेनर चालकाने गाडी न्यूट्रल स्थितीत ठेवली असावी आणि अतिवेगामुळे कंटेनरवरील त्याचे नियंत्रण सुटल्याने अपघात घडला. त्यामुळे हा अपघात मानवी चुकीमुळे झाला, असे प्राथमिक अहवालात नमूद करण्यात आलं आहे. पुणे आरटीओकडून सातारा ते पुणे दरम्यान वाहने तपासण्यासाठी आणखी एक पथक तयार करण्यात आलं आहे. यापूर्वी फक्त एकच पथक तपासणी करत होते; आता दोन पथकांमध्ये एकंदर 10 अधिकारी वाहने तपासतील. त्यापैकी एक पथक महामार्गावर फिरत राहून वाहनांची तपासणी करेल, तर दुसरे पथक टोल नाका परिसरात वाहने थांबवून तपासणी करेल. वाहनांची कागदपत्रे आणि ओव्हरलोडिंगची स्थिती तपासली जाईल. पथकर नाका परिसरात जड वाहनांच्या चालकांमध्ये सुरक्षा आणि नियमावलीबाबत जनजागृतीही केली जाणार असल्याचं प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितलं आहे.

**याद्या**-सीमा

पिंपरी चिंचवड महापालिकेन प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. यावर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी 27 नोव्हेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली असून काल दिवसभरात 'ह' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत 17 हरकती आणि सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. या मतदार याद्या आठही क्षेत्रीय कार्यालयात उपलब्ध असून महापालिकेच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आपली माहिती तपासण्याचं आवाहन महापालिका प्रशासनानं केलं आहे.

**संविधान**

पुण्यातील बोपोडी इथं भारतीय संविधान दिनानिमित्त “माझे संविधान–माझा अभिमान” या उपक्रमांतर्गत येत्या २६ नोव्हेंबर रोजी संविधान लोककला शाहिरी जलसा आयोजित करण्यात आला आहे. संविधानातील मूलभूत मूल्यांची तसंच लोकशाही प्रक्रियेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

**<u>सुट्टी</u>**

पुणे शहरातील ज्या सोसायट्यांमध्ये दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा तयार होतो, त्यांनी आपल्या कचऱ्याची विल्हेवाट तिथेच लावणे बंधनकारक आहे. त्यामुळे अशा सोसायट्यांची पाहणी करून त्याचा सविस्तर अहवाल देण्याचा आदेश पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दिला आहे. कौर यांनी काल यासंदर्भात घेतलेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये ओल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनावर अधिक लक्ष देण्यावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**<u>स्वच्छता</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेने सार्वजनिक स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाने आतापर्यंत एकंदर १ लाख ६० हजार ७ शे रुपये दंड वसूल केला आहे.

**<u>सोडत</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, केंद्रशासन आणि राज्य सरकार यांच्या सहकार्याने चिखली सेक्टर क्र. १७ आणि १९ येथे जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी उभारण्यात आलेल्या प्रकल्पातील रिक्त ३२ सदनिकांसाठीची संगणकीय सोडत आज चिंचवड इथं काढण्यात आली. या प्रकल्पामध्ये १५८ इमारती उभारण्यात आल्या आहेत.

**<u>महारेरा</u>**

दोन वर्षांपूर्वी घेतलेल्या नवीन प्रकल्पातील सदनिकेत गळती आणि अन्य दोष आढळून आल्याने विकासकाविरोधात केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना 'महारेरा'ने ३० दिवसांच्या आत सदनिकेतील ही गळती आणि दोष दुरुस्त करण्याचे, तसेच यासंदर्भात भविष्यात कोणतीही तक्रार येणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत. खाजगी बांधकाम कंपनीविरोधात 'महारेरा'कडे तक्रार दाखल करण्यात आली होती.

**<u>रेल्वे</u>**

कल्याण लोणावळा रेल्वे मार्गावर २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान तांत्रिक कामं करण्यात येत आहेत. यामुळे २६ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर दरम्यान काही उपनगरीय गाड्या लोणावळाऐवजी तळेगांवपर्यंत धावतील अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

**<u>मोबाईल</u>**

पुण्यातील ९ पोलीस ठाण्याच्या परिसरातून हरविलेले १७१ मोबाईल एका कार्यक्रमात पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या हस्ते नागरिकांना परत करण्यात आले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 14 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**